# ३१ उद्यानांमध्ये गांडूळ खताची निर्मिती

**नाशिक : शहरातील** महापालिकेच्या उद्यानांमध्ये दररोज होणाऱ्या हरित कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी उद्यान विभागामार्फत सद्यस्थितीत ३१ उद्यानांमध्ये गांडूळ खतनिर्मितीची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. प्रायोगिक तत्त्वावर शहरातील ९० ठिकाणी गांडूळ खतनिर्मितीची व्यवस्था उभारण्याचे प्रस्तावित आहे.

महापालिकेच्या उद्यानांमध्ये रोज होणाऱ्या हरित कचऱ्याची विल्हेवाट कशी लावावी, हा प्रश्न होता. आयुक्त अभिषेक कृष्ण यांनी त्याबाबत पुढाकार घेत उद्यानांमध्ये गांडूळ खतनिर्मिती प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला आणि प्रायोगिक तत्त्वावर पंचवटीतील रासबिहारी लिंकरोडवरील प्रमोद महाजन



उद्यानात त्याची पहिल्यांदा सुरुवात झाली. उद्यानात तयार होणाऱ्या हरित कचऱ्यावर तेथेच प्रक्रिया करून गांडूळ खतांची निर्मिती करायची आणि त्याच खताचा वापर उद्यानातील वृक्षराजी फुलविण्यासाठी करायचा, हा

### विभागनिहाय कार्यान्वित प्रकल्प

- नाशिक पूर्व........................३
- नाशिक पश्चिम...................५
- पंचवटी.............................६
- नाशिकरोड.........................६
- सिडको..............................७
- सातपूर.............................४

त्यामागचा हेतू आहे. त्यानुसार, प्रायोगिक तत्त्वावर ९० उद्यानांची निवड करण्यात आली आहे. गेल्या चार-पाच महिन्यांपासून काही उद्यानांमध्ये गांडूळ खतनिर्मितीसाठी बेड उभारण्याचे काम सुरु होते. त्यानुसार, ४० ठिकाणी बेड तयार करण्यात आले असून, ३१